**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** कागल

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0002 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**01/01/2026 01:32

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 31/12/2025

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 31/12/2025

**Time From (वेळेपासून):** 13:11 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:11 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 31/12/2025 **Time (वेळ):** 23:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/01/2026 01:04 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** भूमि अभिलेख कार्यालय, कागल ता कागल

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): राजेंद्र अशोक सानप

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : अशोक सानप

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1986

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक, लाचलुचपत ,तिबंधक विभाग, कोल्हापूर,कागल,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक, लाचलुचपत ,तिबंधक विभाग, कोल्हापूर,कागल,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8208971207

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शिवराम कष्णा कोरवी | | वडील का नाम : कष्णा कोरवी | 1. हुपरी, ता हातकणंगले, ,कागल, कोल्हापूर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 1,000/ रूपये | 1,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

1,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी राजेंद्र अशोक सानप वय 40 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर मो. नं. 8208971207 समक्ष कागल जि.कोल्हापूर पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

दिनांक 31/12/2025 रोजी मला पोलीस उपअधीक्षक वैष्णवी पाटील यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात बोलावुन घेवुन कळविले की, तक्रारदार तानाजी केरबा पाटील, वय 45 वर्षे, व्यवसाय - शेती, , रा. साके, ता. कागल, जि.कोल्हापूर मो.नं.9595096400 यांचेकडे भूमि अभिलेख कार्यालय कागल येथील शिवराम चव्हाण हे फाळणी नकाशा काढुन देणेसाठी लाच मागणी करत आहेत. तरी तुम्ही तक्रारदार यांचे संपर्कात राहुन, कारवाई करणेसाठी पंच उपलब्ध करून घेणेस व पुढील कारवाई करणेबाबतचा आम्हास मुखशील आदेश दिला. त्यावेळी आम्ही तक्रारदार पाटील यांना फोन करून, त्यांची तक्रार विचारली असता, त्यांनी थोडक्यात तक्रार सांगितली की, मी वरील ठिकाणी राहणेस असून मी गावी शेती करतो. माझी साके, ता.कागल गावी शेतजमीन असुन माझे साके येथील शेतजमीनीची मोजणी मी करून घेणार आहे त्याकरीता माझे शेजाशेजारी असले साके येथील गट नंबर 489 मधील खाते क्रमांक 29, गट नंबर 490 मधील खाते क्रमांक 27, गट नंबर 491 मधील खाते क्रमांक 28 व गट नंबर 14 मधील खाते क्रमांक 177 मधील फाळणी नकाशा मिळणेकामी मी दिनांक 26/11/2025 रोजी उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय कागल येथे अर्ज दिला होता. सदर अर्जाप्रमाणे फाळणी नकाशा मिळणेकरीता मी अधुन मधुन कार्यालयात जावुन तेथे काम करणारे शिवराम चव्हाण यांना भेटत होतो. दिनांक 29/12/2025 रोजी मी भूमी अभिलेख कार्यालय कागल येथे जावुन शिवराम चव्हाण यांची भेट घेवुन त्यांना वरील गट नंबरचे फाळणी नकाशा दया असे म्हणालो असता शिवराम चव्हाण यांनी मला खाते क्रमांक 29,28 व 177 चे फाळणी नकाशा तयार करून घेतले असुन ते तुम्हाला देतो त्यासाठी त्याचे शासकीय चलन भरा असे सांगितले त्याप्रमाणे मी लागलीच 150/- रूपयांचे शासकीय चलन भरून शिवराम चव्हाण यांना भेटलो. त्यावेळी मी त्यांना तयार असलेल्या खाते क्रमांकाचे नकाशे दया असे म्हणालो असता त्यांनी मला नकाशे देतो पण 1000/- रूपये दया त्याशिवाय नकाशे देणार नाही असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना शासकीय चलन भरले आहे नकाशे दया असे म्हणालो परंतु त्यांनी 1000/- रूपये दिलेशिवाय नकाशे मिळणार नाहीत असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना आता माझेकडे पैसे नाहीत उदया पैसे देतो असे सांगुन तेथुन निघुन आलो आहे. शिवराम चव्हाण हे माझेकडे 1,000/- रूपये लाच मागत असल्याची खात्री झाली आहे. परंतु शिवराम चव्हाण यांनी मागणी केलेले पैसे देण्याची माझी इच्छा नाही. तरी त्यांचेवर कारवाई करावी म्हणुन तक्रार सांगुन, मी शिवराम चव्हाण यांना दिनांक 31/12/2025 रोजी दुपारी 01.30 वा चे सुमारास भूमि अभिलेख कार्यालय कागल येथे भेटणेस जाणार आहे. तरी तुम्ही ग्रामीण रूग्नालय कागल जवळ मोकळया जागेत या, तेथे मी तुम्हाला भेटुन माझा तक्रारी अर्ज देतो असे सांगितले. त्यावेळी आम्ही तक्रारदार पाटील यांना त्यांनी सांगितले ठिकाणी 12.30 वा चे सुमारास पोहचत असल्याचे सांगुन, तेथे त्यांना हजर राहणेस सांगितले. त्यानंतर मी लागलीच मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कोल्हापूर यांचे कार्यालयातुन लेखी रिपोर्टने दोन शासकीय पंच यांना दिनांक 31/12/2025 रोजी तात्काळ गोपनिय कामकाजाकरीता पाठवावे असे कळविले. दिनांक 31/12/2025 रोजी सकाळी 11.45 वा चे सुमारास दोन शासकीय पंच 01) संदिप रामगोंडा पाटील कनिष्ठ लिपीक, 02) संजय बापू फराकटे वरिष्ठ लिपीक असे हजर झाले. त्यानंतर आम्ही, सापळा पथकातील अंमलदार, शासकीय दोन्ही पंच असे सापळा कारवाई करीता आवश्यक असलेली सामुग्री घेवुन, कार्यालयातील अंमलदार पो.हे.कॉ.संदिप काशीद, पो.ना.सचिन पाटील, पो.कॉ.कृष्णा पाटील असे खाजगी चार चाकी वाहनातुन कोल्हापूर, गोकुळ शिरगाव मार्गे कागल गावचे हददीत ग्रामीण रूग्नालय कागल जवळ रिकाम्या जागी आलो. त्यावेळी तेथे तक्रारदार उपस्थित होते. त्यावेळी मी तक्रारदार पाटील यांना स्टाफ, शासकीय पंच यांचेशी ओळख करून दिली. त्यानंतर माझे सुचनेवरून तक्रारदार पाटील यांनी वरीलप्रमाणे त्यांची तक्रार पंचाना सांगितली. त्यानंतर तक्रारदार पाटील यांनी त्यांचा तक्रारी अर्ज आमचेकडे दिला. तक्रारदार पाटील यांनी सांगितलेली व लेखी

तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी, व दोन्ही पंचानी तक्रारी अर्जावर सहया केल्या. तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार पाटील व पंच नं.01 संदिप पाटील यांचेसह भूमि अभिलेख कार्यालय कागल येथे शिवराम चव्हाण यांची भेट घेणेकरीता पाठवुन, पाटील यांचे तक्रारीप्रमाणे, त्यांचेकडे शिवराम चव्हाण हे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची आपण प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगुन,पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपूर्ण सुचना दिल्या. शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये झक्ड कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून,रेकॉर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार पाटील व पंचाची खात्री करून दिली. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार पाटील व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 13.11 वाजता चालु करून, तो तक्रारदार पाटील यांचे गळयात काळया दो-याच्या साहयाने अडकवुन, तक्रारदार पाटील व पंच नं.1 संदिप पाटील यांना शिवराम चव्हाण यांची भेट घेण्याकरीता तक्रारदार पाटील यांचे मोटर सायकल क्रमांक एमएच 09 सी.बी.5527 वरून पाठविले. त्यावेळी आम्ही सापळा पथक व पंच नं.02 संजय फराकटे गाडीत थांबुन राहीलो. तक्रारदार पाटील व पंच नं.1 संदिप पाटील असे शिवराम चव्हाण यांना भेटुन आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर 13.35 वाजता बंद केला. त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.01 संदिप पाटील यांना भूमि अभिलेख कार्यालय कागल येथे शिवराम चव्हाण यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी तक्रारदार पाटील यांचे सोबत भूमि अभिलेख कार्यालय कागल येथे गेलो. तेथे तक्रारदार शिवराम चव्हाण यांना भेटले त्यावेळी त्यांचेत तक्रारदार यांचे कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी तक्रारदार यांनी "आणि परवा आपण बोललेला काय झालं" असे म्हणाले. त्यावेळी शिवराम चव्हाण " आण की असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार पाटील "किती होत्यात ते परवा किती म्हटला, किती होत्यात ते असे म्हणाले. त्यावेळी शिवराम चव्हाण "तुम्हाला किती मी सांगितलेलं" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार पाटील "किती आता तुम्ही .... माझा पण लक्षात नाही" असे म्हणाले. त्यावेळी शिवराम चव्हाण "नाय मग राहू दे घेवून जावा तसचं ते लक्षात नाही"असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार पाटील "तुम्ही एक हजार रूपये म्हटलेला " असे म्हणाले. त्यांनतर त्यांचेत मोजनीचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी तक्रारदार पाटील यांनी त्यांना "ते नव्ह" असे म्हणाले असता, शिवराम चव्हाण यांनी "मी सांगत बसत नाही" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार पाटील "बोला तर अस कस" असे म्हणाले. त्यावेळी शिवराम चव्हाण "नाय बाबा मी बोलत नाही एकदा बोललो" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार पाटील " मग सांगा तर " असे म्हणाले. त्यावेळी शिवराम चव्हाण "तुमचं तुम्ही हे करा तुम्हाला माहित हाय, मी हे करीत नाही " असे म्हणुन हाताचे एक बोट दाखवुन इशारा केला. त्यावेळी तक्रारदार पाटील "एक हजार रूपये देतो " असे म्हणाले. त्यावेळी शिवराम चव्हाण हु,"दया काय दयायचे ते दया," ठिक हाय.. असे म्हणाले. त्यानंतर मी व तक्रारदार पाटील तेथुन निघुन, आपले जवळ आलो आहे असे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार पाटील यांना शिवराम चव्हाण यांना भेटण्यास गेले नंतर काय हकीकत घडली याबाबत विचारले असता त्यांनी पंच नं. 1 संदिप पाटील यांचे हकीकतीस मिळतीजुळती हकीकत सांगितली.

पंच संदिप पाटील व तक्रारदार पाटील यांचेकडुन हकीकत ऐकुण व्हाईस रेकॉर्डमधील रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता, तक्रारदार पाटील यांचेकडे शिवराम चव्हाण यांनी साके येथील गट नंबर 489 मधील खाते क्रमांक 29, गट नंबर 491 मधील खाते क्रमांक 28 व गट नंबर 14 मधील खाते क्रमांक 177 मधील फाळणी नकाशा देणेसाठी तसेच गट नंबर 490 मधील खाते क्रमांक 27 च्या नकाशाचे काम पुर्ण करण्यासाठी 1,000/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निषन्न झाले. शिवराम चव्हाण यांनी तक्रारदार पाटील यांचेकडे फाळणी नकाशा देणेसाठी 1,000/- रूपये मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने आम्ही भूमि अभिलेख कार्यालय, कागल येथे काम करणारे शिवराम चव्हाण यांचे लाच मागणीचे अनुषंगाने सापळा कारवाई सुरू केली.

सापळा कारवाईचे अनुषंगाने आम्ही सर्वांना सर्व सुचना दिल्या. त्यानंतर मी तक्रारदार पाटील यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील 500/- दराच्या 02 चलनी नोटा अशी 1,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार पाटील व पंचाना अॅथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व, संपुर्ण कार्यवाही, तसेच त्याअनुषंगाने तक्रारदार पाटील व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. त्यानंतर अॅथ्रासिन लावलेले 1,000/- रूपये तक्रारदार यांचे शर्टचे डावे बाजुच्या खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार पाटील, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. तसेच तक्रारदार पाटील यांना भूमि अभिलेख कार्यालय, कागल येथे काम करणारे शिवराम चव्हाण यांनी लाचेची रक्कम स्विकारलेनंतर त्यांनी त्यांचे अंगावरील जॅकेटची चेन पुर्ण उघडण्याचा पुर्वनियोजीत इशारा करणेचा आहे असे सांगितले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर 14.49 वाजता सुरू करून, तो तक्रारदार पाटील यांचे शर्टचे आतमध्ये काळे दो-याचे साहयाने गळयात

अडकवला. त्यानंतर तक्रारदार पाटील व पंच नं.1 संदिप पाटील असे त्यांचे मोटर सायकलने आम्ही थांबलेल्या ठिकाणाहुन ग्रामीण रूग्णालय कागल पासुन भूमि अभिलेख कार्यालय कागलकडे निघाले. त्यावेळी त्यांचे पाठोपाठ मी, सापळा पथक, पंच नं.2 संजय फराकटे असे आमचेकडील चारचाकी वाहनातुन तक्रारदार यांचे पाठोपाठ भूमि अभिलेख कार्यालय कागल जवळ आलो. त्यावेळी तक्रारदार पाटील व पंच नं.1 संदिप पाटील असे भूमि अभिलेख कार्यालय कागल कार्यालयात गेले. आम्ही भूमि अभिलेख कार्यालयाचे आजुबाजुला सापळा लावुन थांबलो. तक्रारदार पाटील यांनी भूमि अभिलेख कार्यालय, कागल येथे काम करणारे शिवराम चव्हाण यांनी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला असता मी, पंच नं.02 संजय फराकटे व स्टाफ तेथे गेलो. तक्रारदार पाटील यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर 15.11 वाजता बंद करून, तात्काळ लाच स्विकारलेल्या रक्कमेसह शिवराम चव्हाण यांना पकडले. त्यावेळी आम्ही तक्रारदार व पंच यांना सापळा कारवाईवेळी काय हकीकत घडली असे विचारले असता, त्यांनी सांगितले की, तक्रारदार पाटील व शिवराम चव्हाण हे पाटील यांचे कामाचे अनुषंगाने बोलले. त्यावेळी शिवराम चव्हाण यांनी तक्रारदार पाटील यांना "दे, इथं खालती ठेव ,माणसं बघतील खालती ठेव, ते घेवून जा." असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार पाटील यांनी शिवराम कोरवी यांनी सांगितलेप्रमाणे त्यांचे टेबलवरती असले रजिस्टरच्या खाली असल्या कागदावरती ठेवले. त्यावेळी तक्रारदार यांनी शिवराम चव्हाण यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतरचा नियोजीत इशारा केला असल्याचे सांगितले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या केल्या. त्यावेळी शिवराम चव्हाण यांना आम्ही त्यांचे नाव, पद व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव शिवराम कृष्णा कोरवी, पद- शासकीय दफ्तर बंद वर्ग-3, भूमि अभिलेख कार्यालय, कागल, रा. हुपरी, ता. कागल, जि.कोल्हापूर असल्याचे सांगितले. त्यावेळी आम्ही तक्रारदार पाटील यांना शिवराम चव्हाण यांचे नाव शिवराम कृष्णा कोरवी असे असल्याचे सांगितले. सदर ठिकाणचे व्हिडीओ शुटींग पो.हे.कॉ काशीद यांनी केले आहे. सदर ठिकाणी तक्रारीचे अनुषंगाने आवश्यक असणारी कागदपत्रे ताब्यात घेतली. त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही कागल पोलीस ठाणे येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी यातील मुळ तक्रारदार तानाजी केरबा पाटील, रा. साके, ता. कागल, जि.कोल्हापूर हे त्यांचे शेत जमीनीची मोजनी करून घेणार असल्याने त्यांनी त्यांचे शेत जमीनीचे शेजारील मौजे साके येथील गट नंबर 489 मधील खाते क्रमांक 29,गट क्रमांक 490 मधील खाते क्रमांक 27, गट नंबर 491 मधील खाते क्रमांक 28, व गट नंबर 14 मधील खाते क्रमांक 177 मधील फाळणी नकाशा मिळणेसाठी भूमि अभिलेख कार्यालय कागल येथे अर्ज केला होता. त्याप्रमाणे गट नंबर 489, गट नंबर 491,गट नंबर 14 या तिन खाते क्रमांकाचा फाळणी नकाशा देणसाठी व गट क्रमांक 490 मधील खाते क्रमांक 27 चा नकाशा पुर्ण करून देण्यासाठी शिवराम कृष्णा कोरवी, पद- शासकीय दफ्तर बंद वर्ग-3, भूमि अभिलेख कार्यालय, कागल, रा. हुपरी, ता. कागल, जि.कोल्हापूर यांनी तक्रारदार पाटील यांचेकडे 1,000/- रूपयांची लाचेची बेकायदेशिरपणे मागणी करून मागणी केलेली 1,000/- रूपये लाच रक्कम तक्रारदार पाटील यांचेकडुन, बेकायदेशीरपणे व अप्रामाणिकपणे स्विकारताना त्यांना आम्ही व सापळा पथकाने पकडले आहे. म्हणुन माझी शिवराम कृष्णा कोरवी, वय 55 वर्षे, पद- शासकीय दफ्तर बंद वर्ग-3, भूमि अभिलेख कार्यालय, कागल रा. हुपरी, ता. कागल, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द माझी फिर्याद आहे.

माझा वरील वर्दीजबाब मी सांगितले प्रमाण,े संगणकावर टंकलिखित केलेला असून, तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**
Gangadhar Dhondibhau Ghawate(I (Inspector)) / PBMH76157

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **or (किंवा)**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची सही)**

ठाणे अंमलदार
कासार वडवली पोलीस ठाणे

**Name (नाव):** Gangadhar Dhondib
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PBMH76157